निशाणी क्र. यू- ७ अर्ज डब्लूसी ३१ नं. /बी-५/२०२३

**अर्जदाराचा उलटतपास सामनेला क्रमांक १ तर्फे वकील श्रीमती स्वाती पाटील यांच्यामार्फत शपथेवर सुरू.**

माझा मुलगा सामनेवाला क्र. १ यांच्या गाडीवर चालक म्हणून कामाला होता. तो त्यांच्याकडे अपघात होण्याआगोदर चार महिन्यांपासून काम करत होता. सामनेवाला क्र. १ त्यास महिना रक्कम रूपये १२०००/- इतका पगार देत होते. सामनेवाला क्र. १ याने त्यांच्या गाडीचा विमा सामनेवाला क्र. २ कंपनीकडे काढला होता याची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा विमा अपघातावेळेस मुदतीत होता. हे म्हणणे खरे आहे की, विमा मुदतीत असल्यामुळे सामनेवाला क्र. २ नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला क्र. १ नुकसान भरपाई देण्यास जबाबदार नाहीत.

**उलटतपास सामनेवाला. क्र २ यांचे मार्फत वकील श्री. आर. ए. गायकवाड.**

माझा मुलगा व्हॅगन आर या चार चाकी गाडीवर चालक होता. माझ्या मुलाचे शिक्षण ८वी पर्यंत झाले होते. सामनेवाला क्र. १ यांच्या कडे भरपूर वाहने आहेत. त्यांच्याकडे साधारण ३ ते ४ वाहने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला क्र. १ यांच्याकडे वाहनांवर चालक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा फक्त भाडे आल्यानंतर कामाला जात असे. हे मी सांगू शकत नाही की, सामनेवाला क्र. १ माझ्या मुलाच्या हजेरीचे व पगाराचे रेकॉर्ड ठेवत असत किंवा कसे. हे मी सांगू शकत नाही की, सामनेवाला क्र. १ माझ्या मुलाचा पगार बॅंकेमध्ये जमा करत असत किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला क्र. १ माझ्या मुलाला दर महा १२०००/- रूपये पगार देत असेत हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही

की, अपघाताच्या वेळेस माझ्या मुलाकडे मुदतीत वाहत परवाना नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे सामनेवाला क्र. २ कंपनी मला नुकसान भरपाई देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला क्र. २ या कंपनीची नुकसान भरपाईवर व्याज देण्याची जबाबदारी नाही. हे म्हणणे खरे नाही की, विम्यामधील अटी व शर्तीचा भंग झाला तर विमा कंपनी नुकसान भरपाई देण्यास बांधील नसते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलामध्ये व सामनेवाला क्र. १ यांच्यामध्ये मालक व नोकर असे संबंध अस्तित्वात नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला क्र. १ यांनी दाखल केलेला पगाराचा दाखला हा खोटा व चूकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दाखला दाखल करून विमा कंपनीकडून नुकसान भरपाई मिळविण्याचा प्रयत्न करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्विकृती,**

HANGE GAURAV SADASHIV

Digitally signed by HANGE GAURAV SADASHIV
Date: 2025.12.18 13:12:00 +0530

**( गौ. स. हांगे )**
**न्यायाधीश**
**कामगार न्यायालय, रायगड - अलिबाग.**

दिनांक - १२/१२/२०२५

स्थळ - अलिबाग.